# ख्रिस्ताडेल्फीयन्स

(ख्रिस्तामधील बंधू व भगिनी)

सादर करीत आहोत एक बायबलवर आधारलेला समाज

रॉब हाईंडमन यांजतर्फे

# ख्रिस्ताडेल्फीयन्स

## (ख्रिस्तामधील बंधू व भगिनी)

## सादर करीत आहोत एक बायबलवर आधारलेला समाज

## रॉब हाईंडमन यांजतर्फे

ख्रिस्ताडेल्फीयन्स हा एक लहानसा धर्मिक समाज आहे. न्यू टेस्तामेंटच्या काळातील सुरुवातीच्या ख्रिश्चन चर्चच्या श्रद्धा, विश्वास आणि चारित्र्याकडे परत जाण्याचा प्रयत्न या समाजाने केलेला आहे.

"ख्रिस्ताडेल्फीयन्स" हे नाव गेली / सुमारे दीडशे वर्षे वापरले जात आहे. दोन ग्रीक शब्दांपासून ते तयार झालेले असून त्याचा अर्थ "ख्रिस्तामधील बंधू व भगिनी" असा होतो.
(पहा मत्तय शुभवर्तमान २३:८; कलसैकरांस पत्र १:२; इब्री लोकांस पत्र २:११)

जगभरातील १२० देशांमध्ये आम्ही पसरलेले आहोत. त्यातही इंग्लंड, ऑस्ट्रेलिया व न्तूझीलंड, उत्तर अमेरिका, भारत, आशिया आणि आफ्रिका येथे

आमची संख्या विशेष दखल घेण्याइतकी मोठी आहे. सुरुवातीच्य किंवा पुरातन काळातील ख्रिश्चनांप्रमाणे आम्ही घरांमध्ये किंवा भाडयाने घेतलेल्या खोल्यांमध्ये किंवा कधीकधी आमच्या स्वतःच्या दालनांमध्ये एकत्र जमतो.
(पहा प्रेषितांचीं कृत्यें १:१३-१४, २:४६-४७, १८:७, १९:९, २८:३०)

आम्ही एक सर्वसामान्य प्रतीचा समाज आहोत असे म्हणता येईल व या समाजाची रचना पहिल्या शतकातील ख्रिश्चनांच्या धर्तीवर आहे. प्रत्येक धार्मिक समुदायाला "एक्लीझिया" म्हटले जाते. (ग्रीक नवा करारमध्ये या शब्दांचा अर्थ "चर्च" असा दिला आहे.) आमच्याकडे वेतनावर नियुक्त असे पाद्री किंवा धर्मगुरु नाहीत किंवा आधिकारपरत्वे नियुक्त असे चर्चचे धर्माधिकारी मंडळ देखील नाही. प्रत्येक धार्मिक समुदायाच्या सदस्यांना "बंधू" किंवा "भगिनी" असे पुकारले वा संबोधले जाते. तसेच आमच्या सर्व हालचाली किंवा आयोजित कार्यक्र. मांमध्ये सर्वच जण सहभागी होत असतात. देवाच्या सेवेसाठी सर्वच सदस्य आपला वेळ, साधनसंपत्ती आणि शक्ती स्वयंस्फूर्तपणे देत असतात. आमच्यातला बंधूभाव एका समान मजबूत आणि दृढ श्रद्धेने बंधलेला असतो.
(पहा रोमकरांस पत्र १२:४-८; १ करिंथकरांस पत्र १२:४-२७; गलतीकरांस पत्र ३:२८)

बायबल हा आमचा एकमेव मार्गदर्शक असल्याचे आम्ही मानतो आणि बायबल हा देवाचा चैतन्याने भरलेला शब्दाविष्कार आहे यावर आमचा ठाम विश्वास आहे. बाप्तिस्मा प्राप्त झालेल्या (संपूर्णपणे पाण्यात बुडवून) आणि असाच श्रद्धा – विश्वास असलेल्यांना आमच्या समूहाचे सदस्यत्व खुले आहे.

## *अल्प – इतिहास*

ख्रिस्ताडेल्फीयन्सचा ज्यावर ठाम विश्वास आहे त्यावच ख्रिस्ताने धर्मशिकवणीसाठी पाठवलेल्या बाराजणांचा (अपोस्टल्स) आणि त्याखेरीजही अनेकांचा पुरेपूर विश्वास आहे. या साऱ्यांचा श्रद्धा समान आहेत. जगात इतके

अगणित स्वतंत्र समाज आहेत की ज्यांनी बायबलचा मोठया निष्ठेने बारीकसारिक तपशिलांसह अभ्यास केला आहे आणि त्यातील साध्या सरळ शिकवणीचा स्वीकार – अंगिकार केला आहे.

ख्रिस्ताडेल्फीयन्सचा श्रद्धा आणि प्रथा – परंपरा यांचा उगम नवा करार ते पहिल्या दुसऱ्या शतकातील ख्रिश्चनांच्या "एपीस्टल ऑफ क्लेमेंट" "द टीचींग्ज" आणि "द अपोस्टल्स क्रीड" यासारख्या ग्रंथात सापडेल.

जसे १६ व्या शतकातील सुधारणामुंळे युरोपमध्ये धार्मिक स्वातंत्र्याचे युग अवतरले, तेव्हापासून बायबल प्रमाणभूत मानणाऱ्या गटांमध्ये याच श्रद्धा आणि प्रथा – परंपरांचा पुन्हा उद्भव झाला. स्वीस ॲनाबाप्टिस्ट्स आणि पोलिश सॉकीनियन्स या गटांमध्ये हे फार ठळकपणे जाणवले. सुरुवातीच्या इंग्लिश बाप्टिस्टांमध्येही हयाच श्रद्धा आढळलेल्या होत्या (आजच्या बाप्टिस्टांमध्ये या श्रद्धांवर विश्वास ठेवणारे दिसत नाहीत). १८ व्या शतकात सर आयझॅक न्यूटन आणि विल्यम व्हिस्टन यासारख्या नामवंतांनीही याच श्रद्धा जोपासलेल्या आढळून येतात.

आधुनिक ख्रिस्ताडेल्फीयन्स चळवळीचे मूळ १८३०च्या काळातले आहे. अमेरिका आणि इंग्लंडमध्ये सुधारणा व पुनर्निर्माणाचा हा काळ होता. अमेरिकेत एका जॉन थॉमस नावाच्या डॉक्टरने "हेरॉल्ड ऑफ द किंगडम" प्रसिद्ध केले. त्यात देवाचे राज्य आणि पुनरुत्थान याबाबतच्या बायबलमधील शिकवणीचा प्रमुख अंश होता. इंग्लंडमध्ये रॉबर्ट रॉबर्ट्स या पत्रकाराने "ॲम्बॅसडर ऑफ द कमिंग एज" मधून याच शिकवणींचा पुरस्कार केला होता. थॉमस आणि रॉबर्ट्स यापैकी कोणीही द्रष्टेपणाचा आव आणला नाही की वैयक्तिक घमेंडही दाखवली नाही. आपण फक्त बायबलचे प्रामाणिक विद्यार्थी राहण्याचा प्रयत्न केला आहे एवढेच त्यांनी नमूद केले.

१८६१ मध्ये तेव्हा अमेरिकेत यादवी माजली तेव्हा न लढलेल्या ख्रिश्चन गटांना मध्यवर्ती सरकारकडे आपली नोंद करावी लागली होती. इलनॉई प्रांतातील ओगले परगण्यात सॅम कॉफमन आणि इतर बंधूंनी स्वतःची नोंद "ख्रिस्तामधील बंधू किंवा

ख्रिस्ताडेल्फीयन्स” अशी केली. अमेरिकेतील इतर व इंग्लंडमधील समविचारी श्रद्धाळू गटांनी लवकरच याच नावाचा स्वीकार केला. तेव्हापासून जगात सर्वत्र व देशोदेशी स्वतंत्र ख्रिस्ताडेल्फीयन्स गट प्रस्थापित झालेले आहेत.

या पुस्तिकेच्या पुढील भागात आहेत:

१) आमच्या श्रद्धा

२) आमची जीवनपद्धती

३) आमचे मैत्र, आराधना, अनुभव.

# १) आमच्या श्रद्धा

*द बायबल*

मानवजातीला देवाने उघडपणे दिलेला एकमेव संदेश म्हणजे बायबल असा आमचा विश्वास आहे. देवावर व त्याच्या पुत्रावर विश्वास ठेवण्यासाठी बायबल दिले गेले आहे. ती अखेरची आणि  अंतिम व अद्वितीय अधिकारवाणी आहे. प्रत्येकी वेळी तिचे वाचन प्रार्थनायुक्त पद्धतीने आनि पुरेपूर काळजीने केले गेले पाहिजे.
(तिमथ्याला दुसरे पत्र ३:१६-१७; पेत्राचे पहिले पत्र १:१०-१२; पेत्राचे दुसरे पत्र १:२०-२१; प्रेषितांचीं कृत्यें १७:११; इफिसकरांस पत्र २:२०; रोमकरांस पत्र १६:२६)

*देव*

देव केवळ एकच, चिरस्थायी, अमर्त्य आहे. त्याला एकच मुलगा येशू ख्रिस्त आहे आणि पवित्र आत्मा ही त्याची शक्ती आहे.
(अनुवाद ६:४; लुक शभुवर्तमान १:३५; प्रषितांचीं कृत्यें १:८; करिंथकरांस पहिले पत्र ८:६; तिमथ्याला पहिले पत्र १:१७, २:५, ६:१६)

*मानव*

मानव हा मर्त्य आहे आणि देवापुढे तो पापी आहे. त्याचे सर्वस्वच पापाकडे झुकलेले आहे आणि पापाला शिक्षा आहे मृत्यू – संपूर्ण जीवनाचा अंत.

(यिर्मया १७:९; मार्क शुभवर्तमान ७:२१-२३; रोमकरांस पत्र ३:२३; याकोबाचे पत्र १:१३-१५; रोमकरांस पत्र ६:२३; उपदेशक ९:५,१०; स्तोत्रसंहिता ११५:१७, १४६:४)

*आशा*

मृत्यूनंतर जीवनाची केवळ एकमेव आशा म्हणजे शरीराचे पुनरुत्थान आणि पृथ्वीवर देवाच्या राज्यात शाश्वत जीवन.
(स्तोत्रसंहिता ४९:१२-२०; योहान शुभवर्तमान ११:२५-२६; प्रषितांचीं कृत्यें २४:१५; रोमकरांस पत्र ८:२२-३९; करिंथकरांस पहिले पत्र १५:१२; योहानाला झालेले प्रकटीकरण ५:१०, २०:४)

*वचन*

जुना करारच्या काळात देवाने अब्राहम आणि दावीद यांना दिलेली आश्वासने – वचने आणि स्वतः आचरणात आणलेली तत्वे ही एकमेकांपासून वेगळी किंवा अलग करता न येणारी आहेत. येशू ख्रिस्ताने ती आश्वासने प्रत्यक्षात पाळलेली आहेत.
(प्रषितांचीं कृत्यें १३:३२; उत्पत्ती १३:१४-१७, २२:१५-१८; २ शमुवेल ७:१२,१६; लुक शुभवर्तमान १:३१-३३; गलतीकरांस पत्र ३:६-९,१६,२६-२९)

*देवाने जगावर इतके प्रेम केले*

देवाने जगावर इतके भरभरुन प्रेम केले की येशूला, त्याच्या मुलाला, देवाने या जगात पाठवले. मानवांना पापांपासून वाचवण्यासाठी येशू हया जगात आला. जे त्याच्यावर विश्वास ठेवतील, श्रद्धा ठेवतील त्यांचा नायनाट वा नाश होणार नाही उलड त्यांना चिरशाश्वत जीवन लाभेल.
(मत्तय शुभवर्तमान १:२०-२१, ३:१७; लुक शुभवर्तमान १:३५; योहान शुभवर्तमान ३:१६)

### *ख्रिस्ताचा त्याग*

येशू पापांपासून अलिप्त होता-दूर होता. देवाचा प्रामाणिकपणा – चांगुलपण दाखवण्यासाठी त्याने मृत्यू पत्करला. त्याच्या त्यागाचा स्वीकार करणाऱ्यांना पापमुक्त करुन त्यांचे जीवन उजळवून टाकणारी येशूची ही कश्ती होती. देवाने त्याच्या मृत्यूनंतर त्याला जिवंत केले, त्याला अमरत्व दिले. पृथ्वीवर आणि स्वर्गात त्याला सर्वाधिकार बहाल केले आणि देव व मानव यांच्यातील मध्यस्थ, दुवा किंवा साखळी म्हणून प्रस्थापित केले.
(रोमकरांस पत्र ३:२१-२६; इफिसकरांस पत्र १:१९-२३; तिमथ्याला पहिले पत्र २:५-६; इब्री लेकांस पत्र ४:१४-१६)

### *येशूचे पुनरागमन*

येशू लवकरच पृथ्वीवर परतणार आहे. त्यावेळी तो अनेक मृतांना संजीवनी प्रदान करुन जिवंत करील. जिवंत लोकांबरोबर या नव-जिवंतांची तुलना करील, आढावा घेईल आणि श्रद्धावानांना देवाच्या राज्यात अढळ-आयुष्य, चिरशाशवत जीवन प्रदान करील.
(दानीएल १२:२; मत्तय शुभवर्तमान २५:३१-३४; लुक शुभवर्तमान २१:२०-३२; योहान शुभवर्तमान ५:२८-२९; प्रेषितांचीं कृत्यें १:११; तिमथ्याला दुसरे पत्र ४:१; योहानाला झालेले प्रकटीकरण २२:१२)

### *देवाचे राज्य*

पृथ्वीवर देवाचे राज्य प्रस्थापित होईल. येशू हा येरुसलेममधील राजा बनेल. त्याचा अंमल जगभर चालेल आणि त्याचे शासन सनातन प्रामाणिकपणा व शांतता प्रस्थापित करील.
(स्तोत्रसंहिता ७२; यशया २:२-४, ९:६-७, ११:१-९, ६१:१-११; यिर्मया ३:१७; दानीएल २:४४, ७:१४,२७; प्रेषितांचीं कृत्यें ३:२१)

*मुक्तीचा मार्ग*

देवाच्या राज्यात प्रवेश करण्याचा मार्ग श्रद्धेचा आहे. त्यात बायबलवरील विश्वास आणि त्यात दिलेल्या आवश्यक बाबींची पूर्तता यांचा समावेश आहे. या आवश्यक बाबी म्हणजे स्त्री व पुरुषांनी आपली पापे कबूल करणे, पश्चात्ताप करणे, बाप्तिस्मा घेणे आणि श्रद्धेने येशूचा मार्ग चोखाळणे इत्यादी आहेत.
(मत्तय शुभवर्तमान १६:२४-२७; मार्क शुभवर्तमान १६:१६; योहान शुभवर्तमान ३:३-५; प्रेषितांचीं कृत्यें २:३७-३८, ४:१२; तिमथ्याला दुसरे पत्र ३:१५; इब्री लेकांस पत्र ११:६)

*काही महत्वाचे फरक*

आम्हाला नेहमी हा प्रश्न विचारला जातो की "तुम्ही ख्रिश्चन गटांपासून वेगळे कसे?" (पाद्री वा धर्माधिकारी नसलेली अशी) आमची संघटना अगदी ठळक वैशिष्टयांनी वेगळी दिसते. त्याखेरीज बहुतेक चर्चेसपासून आमची विचारप्रणाली व तत्वे कशी भिन्न आहेत ते पुढीलप्रमाणे.

ट्रिनीटी धर्मतत्व आम्ही फेटाळून लावतो – ते येशूच्या मृत्यू आणि पुनरुत्थानानंतर अस्तित्वात आलेले आहे आणि तोही चर्च अंतर्गत माजलेल्या वादांमधून उद्भवलेला परिणाम आहे. बायबलची शिकवण आहे की येशू का "पुत्ररुपी देव" म्हणून स्वर्गात "आधीच अस्तित्वात" होता हे चूक आहे – येशू हा प्रत्यक्ष देवाचाच पुत्र आहे.

ट्रिनीटी तत्वामुळे ख्रिस्ताच्या कार्याचे महत्व एकदम गौण होऊन जाते. कारण ख्रिस्तांची मानवता (मनुष्य म्हणून असलेले अस्तित्व) आणि त्याच्या मृत्यूचे वास्तव हे दोन्ही ट्रिनीटी नाकारते. कारण जर तो देव असेल म्हणजेच मनुष्य नसेल) तर त्याला कोणत्याही बाबीचे प्रलोभन वाटणार नाही तसेच तो मरणारही नाही.

(तिमथ्याला पहिले पत्र २:५; करिंथकरांस पहिले पत्र ११:३; इब्री लोकांस पत्र ५:८)

"अविनाशी आत्मा" मृत्यूनंतर स्वर्गाला जातो ही लोकप्रिय कल्पनाही आम्हाला मंजूर नाही. बायबलची शिकवण अशी आहे की चिरशाश्वत जीवनाची एकमेव आशा पुनरुत्थानाची आहे जेव्हा येशू परत येतो आणि देवाच्या राज्यात त्याच्या बरोबर कायमचे आयुष्य येते.
(योहान शुभवर्तमान ३:१३; प्रेषितांचीं कृत्यें २:३४; थेसलनिकेकरांस पहिले पत्र ४:१६)

बाप्तिस्मा अनिवार्य, आवश्यक आहे आणि तो फक्त प्रौढांसाठी आहे यावर आमचा विश्वास आहे. लहान अर्भकांवर किंवा मुलांवर पाणी शिंपडणे हा बाप्तिस्मा नव्हे.
(योहान शुभवर्तमान ३:५; कलसैकरांस पत्र २:१२; पेत्राचे पहिले पत्र ३:२१)

पापयुक्त मानवी स्वभावाचे प्रतीक अशा अर्थानेच बायबलमध्ये "सैतान" शब्द वापरला गेला आहे यावरच आमचा ठाम विश्वास आहे आणि त्यामुळे अतिमानवी किंवा अ-मानुष व्यक्तीमत्वाच्या तत्वाता आम्ही मान्यता देऊच शकत नाही.
(यशया ४५:७; मार्क शुभवर्तमान ८:३३; योहान शुभवर्तमान ६:७०; इब्री लोकांस पत्र १:१४)

# २) आमची जीवनपद्धती

*द बायबल – जीवनाचा मार्गदर्शक ग्रंथ*

सर्वाधिकारी अशा बायबलवरच आपले जीवन आधारित असले पाहिजे. ख्रिस्ताडेल्फीयन्समध्ये सर्वत्र आढळणारी पद्धत म्हणजे रोज बायबलचे वाचन करणे. या वाचनाची एक विशिष्ट रीत आहे – योहना आहे. ती काटेकारपणे अंमलात आणल्यास प्रत्येक वर्षांतून जुना करार एकदा आणि नवा करार दोनदा वाचून पूर्ण होते. अनेकजण याहूनही अधिक वेगाने वाचन करतात.
(रोमकरांस पत्र १५:४; थेसलनिकेकरांस पहिले पत्र २:१३; याकोबाचे पत्र १:२२; तिमथ्याला दुसरे पत्र २:१५)

*प्रार्थना*

नवा कराराच्या दाखल्याला अनुसरुन आणि ख्रिस्ताच्या सूचनेनुसार, आमच्या आकाशातल्या बापाची – देवाची आम्ही प्रार्थना करतो. त्यात देवाचा पुत्र येशूच्या नावाने ही प्रार्थना असते. आम्ही येशूची प्रार्थना न करता देवाचीच प्रार्थना करत असतो. त्यामुळे येशू, जो आमची दुर्बलता, कमजोरी जाणतो त्याच्याबरोबर आमचे व्यक्तीगत संबंध प्रस्थापित होण्याला प्रतिबंध होत नाही.
(योहान शुभवर्तमान १५:१६, १६:२६; इब्री लोकांस पत्र २:१५)

*काम*

प्रेषित पौलच्या उहाहरणाने आणि शिकवणीने आपापल्या स्वतःचा आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह प्रामाणिक कामाने करण्याचे ध्येय सर्व ख्रिस्ताडेल्फीयन्स बाळगतात.

काही व्यवसाय वा पेशे (राजकारण, लष्कर, पोलिस, गुन्हेगारी कायदा) इत्यादी टाळले जातात.
(तिमथ्याला पहिले पत्र ५:८; थेसलनिकेकरांस दुसरे पत्र ३:६-१२)

*कौटुंबिक जीवन*

ख्रिस्त आणि चर्च यांच्या संबंधांची तुलना करता पती व पत्नीचे संबंध समांतर ठरतात. म्हणूनच विवाहाकडे अत्याधिक पावित्र्याच्या भावनेने पाहिले पाहिजे. मुलांच्या संगोपनात देवाचे महत्व, रविवारची प्रार्थना आणि दररोज बायबलाचे वाचन आईवडिलांबरोबर होणे अतिशय महत्वाचे आहे. वयोवृद्धांची काळजी त्यांच्या कुटुंबियांतर्फे व इतर भाऊबंदांतर्फे घेतली जाते.
(इफिसकरांस पत्र ५:२२-३३, ६:४; तिमथ्याला पहिले पत्र ५:४)

*दातृत्व*

ख्रिस्ताडेल्फीयन्स व्यक्तिगत आणि सामूहिक अशा दोन्ही प्रकारे धर्मादायी काम आणि दानधर्म करीत असतात. तथापि “मानवांना दिसले पाहिजे म्हणून” कामे करीत राहणे हे टाळण्याचा आमचा प्रयत्न असतो. तसेच धर्मादाय कामो आणि शिकवण यांची गल्लतही आम्ही करीत नाही. त्यामुळेच, चुकीच्या कारणांसाठी लोकांचे ख्रिस्ताकडे येणे टाळता येते.
(गलतीकरांस ६:१०; याकोबाचे पत्र १:२७, २:१५-१६; मत्तय शुभवर्तमान ६:१-४; योहान शुभवर्तमान ६:२६)

आमचे १० टक्के उत्पन्न आम्ही चर्चला देत (टईथ्) नाही कारण जुना करारमध्ये म्हटल्याप्रमाणे “टईथ्” हे दान धर्मगुरुत्वासाठी आहे आणि आता धर्मगुरुत्वासाठी तर रद्दबातल करण्यात आलेले आहे.
(गणना १८:२४; इब्री लोकांस पत्र ७:१-२८)

*देह आणि आत्मा*

बाप्तिस्मानंतर जीवन बदलण्याचा प्रयत्न केला गेलाच पाहिजे. म्हणजेच देहाकडे न बघता आत्म्याची उन्नती करण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. याचा अर्थ अनैसर्गिक अघोरी शक्ती असा आम्ही करीत नाही. आपल्या जीवनात देवाचा शब्द आणि उदरनिर्वाहाची काळजी या दोन्हीद्वारे देवाची सक्रिय साथ हे ओळखणे एवढा अर्थ आम्ही त्यातून काढतो.
(रोमकरांस पत्र ६:१-४; मार्क शुभवर्तमान १४:३८; गलतीकरांस पत्र ५:२२-२५)

*श्रद्धा आणि कृपा*

आम्ही देवावर संपूर्णपणे अवलंबून राहण्याचा प्रयत्न करतो आणि चांगली कामे – प्रार्थना यासाठी क्रियाशील करणारी श्रद्धा विकसित करण्याचाही आमचा प्रयत्न असतो. मात्र याचवेळी, तारण ईश्वरी कृपेमुळेच मिळू शकतो हे आम्ही पूर्णपणे जाणून घेतलेले आहे.
(इफिसकरांस पत्र २:८)

देवाच्या मदतीने आम्ही त्याला संतुष्ट करण्याचा आणि त्याच्या आज्ञा पाळण्याचा दररोज प्रयत्न करतो. ख्रिस्ताने आपल्या बापाच्या आज्ञा पाळण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचेच अनुकरण आम्ही करीत असतो. त्यादृष्टीनेच कामात उत्साह ठेवण्याची विवाहावर निष्ठा ठेवण्याची, दातृत्वात सढळपणा ठेवण्याची धर्मिक – शिकवणीत संपूर्णपणे झोकून देण्याची आणि आपल्या देवाला सुखी ठेवण्याची आमची धडपड असते.

# ३) आमचे मैत्र, आराधना, अनुभव

*बैठका*

देवाची पूजा करण्यासाठी आणि त्याचा पुत्र येशूच्या त्यागाची आठवण ठेवण्यासाठी आम्ही आठवडयातून एकदा भेटतो. सर्व बाप्तिस्माप्राप्त सदस्य यावेळी ब्रेड व वाईनचा नैवेद्य घेतात.
(करिंथकरांस पहिले पत्र ११:२३-२६, १२:१३; मत्तय शुभवर्तमान २६:२६-३०)

ब्रेड व वाईनच्या नैवेद्याखेरीज या बैठकीत प्रार्थना होतात. बायबलची दोन किंवा तीन प्रकरणे वाचली जातात. अनेक गाणी म्हटली जातात आणि प्रोत्साहनपर "एक्सहार्टेशन" बायबलवर आधारलेले सादर होते. प्रत्येक आठवडयाला बोलणारा बंधू वेगवेगळा असतो.
(इफिसकरांस पत्र ५:१९; तिमथ्याला पहिले पत्र ४:१३; इब्री लोकांस पत्र ३:१३)

या बैठकीत सहभागी होणे हा आमच्या धार्मिक जीवनाचा केंद्रबिंदू असतो. बहुतेक देशांमध्ये ही बैठक रविवारी होते. असे असले तरी इतर कोठल्याही दिवशी, जेथे रविवारी हा सार्वजनिक सुटीचा दिवस नसेल तेथे ही बैठक होऊ शकते (उदाहरणार्थः नेपाळमध्ये शनिवारी आणि बांगलादेशमध्ये शुक्रवारी ही बैठक होत असते). रविवारच्या शाळेत मुले बायबलविषयी शिकू लागतात.
(प्रषितांचीं कृत्यें २:४२, २०:७; करिंथकरांस पहिले पत्र १६:२)

बरेचसे स्थानिक गट आठवडयातील एखाद्या किंवा जास्तही संध्याकाळी बायबल – वर्ग घेत असतात. त्याचप्रमाणे तरुण गटासाठीही कार्यक्रम आयोजित केले जात असतात.

*बायबल शाळा*

ख्रिस्ताडेल्फीयन्समध्ये थिऑलॉजीकल शाळा किंवा सेमीनरीज नाहीत. त्याऐवजी, सर्व सदस्यांसाठी बायबल शाळा भरवल्या जाण्याची पद्धत आहे. तर चर्चेस किंवा महाविद्यालयांमधून भाडयाने घेतलेल्या जागांमध्ये बायबल शाळा किंवा बायबल अभ्यास शिबीरे आयोजित केली जातात. प्रत्येक वर्षी ख्रिस्ताडेल्फीयन्स त्यात एखाद्या आठवडा किंवा अनेक आठवडयांचे सुटीचे दिवस व्यतीत करत असतात.

अशा शाळांमध्ये बहुतांशी दोन किंवा तीन वक्ते असतात. प्रत्येकजण बायबलमधून वेगळा असा विषय आपला म्हणून निवडत असतो.

*संघटना*

प्रत्येक “एक्लिझिया” स्वयं-शासित आहे. राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय असे “नेतृत्व” किंवा “केंद्रीय कार्यालय” असे काहीही नाही. समान श्रद्धेपोटी, त्यावर आधारित अशी मैत्रत्वाची पातळी सारे ख्रिस्ताडेल्फीयन्स राखून ठेवत असतात. अशा तऱ्हेने तयार होणारे समुदायांमधील संबंध हे अधिकतर एका कौटुंबिक पातळीवरचे बनत असतात. इतर अनेक पारंपारिक चर्चेमध्ये असे आमच्यासारखे वातावरण नसते. आमच्या दृष्टीने हे नवा करार मॉडेल आहे.
(इफिसकरांस पत्र ३:१५, ४:१-६; योहानाचे पहिले पत्र १:६-७)

मूळ येरुसलेम चर्चमध्ये १२ ज्येष्ठांकडे “शब्दांचे सत्तापद” (धर्मोपदेश आणि शिकवण) अशी जबाबदारी दिलेली होती. त्याखेरीज सात उपाध्यायांकडे (डीकन्स) कल्याण – व्यवस्थेची “मिनीस्ट्री ऑफ टेबल्स” जबाबदारी सोपवलेली होती. त्याचप्रमाणे इफेससमधील चर्चमध्ये अनेक ओव्हरसीअर्स (अक्षरशः – बिशप्स) ज्येष्ठत्वाच्या नात्याने असत. आधुनिक समुदायाच्या विरुद्ध ती स्थिती होती. सध्याच्या युगात एक पाद्री वेतन वा मानधन घेऊन ही कामे करीत असतो.
(मत्तय शुभवर्तमान २३:८-११; प्रषितांचीं कृत्यें १:२३-२६, ६:१-६, २०:२८)

*धर्मोपदेश*

प्रत्येक “एक्क्लिझिया” देवाच्या राज्यातली “चांगली बातमी” शिकवण्याचा तसेच स्थानिक भागात येशू ख्रिस्ताचे नाव घेण्यासही शिकवण्याचा प्रयत्न करीत असते.
(प्रषितांचीं कृत्यें ८:१२, २८:३१; तिमथ्याला दुसरे पत्र ४:२)

स्थानिक बंधू आणि भगिनींना धर्मोपदेशकाचे शिक्षण देण्यास आणि मदत करण्यास काही सदस्य परदेशी प्रवासही करत असतात. आपापल्या स्वतःच्या प्रदेशातील व्यवस्थेप्रमाणेच परदेशातही या “प्रशिक्षकांना” किंवा स्वयंसेवकांना पैसे वा रकमा दिल्या जात नाहीत.
(प्रषितांचीं कृत्यें २०:३३-३४; थेसलनिकेकारांस पहिले पत्र २:९)

ख्रिस्ताडेल्फीयन्सतर्फे अनेक देशात बायबल परिसंवाद व बायबल शिबीरे आयोजित केली जात असतात आणि तेथे बायबल साहित्य आणि नियतकालिके मिफत वाटली जातात. पौलप्रमाणे आम्हीही आचार – तत्वे मोफत शिकवण्याचे ध्येय ठेवलेले आहे.
(करिंथकरांस पहिले पत्र ९:१८)

*एक आमंत्रण*

ज्या कोठल्या प्रकारे आम्हाला शक्य होईल त्याप्रमाणे देवाच्या सेवेत गुंतलेला, ख्रिस्ताडेल्फीयन्स हा एक बांधीव समाज आहे. जर आपणास अधिक काही माहिती हवी असेल तर कृपया पुढील पानावर दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा.

रॉब हाईंडमन

आपल्या स्थानिक ख्रिस्ताडेल्फीयन्सशी कसा संपर्क साधावयाचा:

**The Christadelphians**
GPO Box 159, Hyderabad
500001, India

*Published and printed by:*

**Printland Publishers**
GPO Box 159, Hyderabad
500001, India

जर या पुस्तिकेच्या शेवटच्या पानावर स्थानिक पत्ता दिलेला नसेल तर सर्व चौकशी वरील पत्त्यावर करणे.

- ख्रिस्ताडेल्फियन्स कोण आहेत?
- ते कशावर श्रद्धा ठेवतात?
- इतर चर्चेसपेक्षा ते वेगळे कसे आहेत?
- त्यांची जीवनपद्धती कशी आहे?
- त्यांची आराधना – अर्चा कशी चालते?

या छोटया पुस्तिकेत रॉब हाईंडमन यांनी जगभरातील ख्रिस्ताडेल्फीयन बंधू – समाजाची ओळख करुन दिली आहे. प्रत्येक विभागाला बायबलमधील उल्लेखांचे संदर्भ जोडलेले आहेत. कृप्या आपल्या स्वतःच्या बायबलमधील संदर्भांशी हे उल्लेख ताडून पाहा.

*विभांगामध्ये यांचा समावेश आहे:*

१) आमच्या श्रद्धा

२) आमची जीवनपद्धती

३) आमचे मैत्र, आराधना, अनुभव

**The Christadelphians**

GPO Box 159, Hyderabad

500001, India